वर्ष २ : अंक ७
फेब्रुवारी : २००८

|वस्तीवासियांचं मासिक माहितीपत्र |पुणे आवृत्ती | मूल्य: रुपये २

# मनोगत

UpLift
Enriching lives of the poor, together

## घडामोडी

डिप्लोमा इन सोशल इंजिनियरिंग

नवनिर्माण समाज विकास केंद्र, या संस्थेने मुंबई येथे सुरु केलेल्या वर्गाची सुरुवात

दिनांक : १७ फेब्रुवारी २००८

अधिक माहितीसाठी संपर्क :
श्री. संतोष जाधव (९८२१६९२२९८)

## बातमी मागील बातमी

सकाळ

पुणे ता. १५ जानेवारी २००८

**होय अंगठा दाखवा अन् हजेरी नोंदवा!**

अंगटा दाखवून हजेरी किंवा उपस्थिती नोंदवली तर काय होईल? काही नाही उलट आपण अत्याधुनिक जगात वावरत असल्याचा हा निकष ठरणार आहे. ही आहे उपस्थिती नोंदविण्याची आधुनिक पद्धत बायोमेट्रिक सिस्टिम असे तिचे नाव आहे.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात लागू झालेली ही पद्धत आता महाविद्यालयीन पातळीवर येऊ लागली आहे. पुण्यात याचा पहिला मान मिळविला आहे लष्करी वैद्यकीय महाविद्यालयाने.

उपस्थिती नोंदविण्यातील गोलमाल पूर्णपणे हद्दपार करणारी तसेच संबंधित परिसरात, आवारात अनोळखी व्यक्तींना पाऊलही टेवता येणार नाही, अशी सुरक्षेची पुरेपूर काळजी घेणारी ही पद्धत.

विद्यार्थ्यांना रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन डिव्हाईस म्हणजे रेडिओ लहरींचा अंतर्भाव असलेले कार्ड देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी हे कार्ड यंत्रासमोर धरल्यावर या यंत्रापुढे अंगटा दाखवायचा आहे. अंगठ्यावरील ठशांवरून विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदविली जाईल. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या अंगठ्यांच्या ठशांचा डाटा बँक म्हणजे माहितीचा साठा आधीच करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या अंगठ्याची पडताळणी हे यंत्र काही क्षणांच्या आत करणार आहे.

---

या बातमीमध्ये बायोमेट्रिक सिस्टिमचा उल्लेख केला आहे. यामध्ये आपली ओळख व्हावी म्हणून सहीऐवजी अंगठ्याच्या ठशांचा सहारा घेतला जातो. बायोमेट्रिक मशीनचा वापर आज जगातील अनेक अशिक्षितांना आधार देत आहे. आपल्याला एटीएम मशीन्स माहीत असतील तर त्यासाठीही आपला अंगठा मशीनवर ठेवल्यास आपल्या खात्यातून पैसे काढता येऊ शकतात. आजवर प्रायोगिक तत्वावर सुरु झालेले हे तंत्रज्ञान लवकरच आपल्यापर्यंत पोहोचेल अशी आशा करु या!

## संपादकीय...

खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका गावामध्ये गणू गवंडी रहात होता. बरेच वर्ष बांधकाम व्यवसायात घालविल्यावर त्याला आपल्या कामाचा कंटाळा येऊ लागला. मालकाने सांगितलेले काम तो नाईलाजाने करीत असे. कामात त्याचे मुळीच लक्ष नसे. आपण अनेकांची घरे बांधतो पण आपल्याकडे स्वत:चे घर नाही याचे त्याला दु:ख होत असे. हळूहळू दिवस निघून गेले आणि गणू म्हातारा झाला. इतक्या वर्षांच्या कष्टातून साठविलेल्या पैशातून उरलेले आयुष्य आपण काढू शकू असा विचार त्याने केला. मालकाला त्याने आपण हे काम आता सोडत असल्याचे सांगितले.

एक कष्टाळू नोकर आता निघून जाणार या विचाराने मालकही दु:खी झाला. त्याने गणूला एक शेवटचे घर बांधून काम सोडण्याची विनंती केली. गणूने कसेबसे काम उरकले. दोन-तीन आठवड्यातच घर बांधून पूर्ण केले. नेहमीप्रमाणे मालकाने घराची पहाणी केली आणि अचानक घराच्या दरवाजाची किल्ली गणूला दिली. मालक म्हणाला, आजपासून हे घर तुझे!

गणूला धक्काच बसला. आपण आपलेच घर बांधत आहोत हे जर मला माहिती असते तर मी वेगळ्या आणि अधिक चांगल्या पद्धतीने ते बांधले असते असा विचार त्याच्या मनात आला. त्याला स्वत:चा खूप राग आला. कारण नेहमीप्रमाणे त्याने हेही घर कसेबसे घाईने बांधून पूर्ण केले होते.

बघितलंत मंडळी, आपले आयुष्य आपणच बांधत असतो. आपल्या क्षमतेपेक्षा कितीतरी पट कमी काम आपण करीत असतो आणि एक दिवस आपल्या लक्षात येते की आपल्याला आपणच बांधलेल्या घरात रहायचे आहे. हेच जर आधी कळले असते तर आपण अधिक चांगल्या पद्धतीने काम केले असते.

आता मागे वळून उपयोग नाही. तेव्हा आपण पुढचा विचार करु या आणि आपले रोजचे काम आपल्या क्षमतेचा पूर्ण वापर करुन करु या. आपले आयुष्य अधिक चांगल्या पद्धतीने बांधू या!

मनोगत तुमच्या साथीला आहेच. मनोगतचे हे नवे रूप आपल्याला आवडेल अशी आशा आहे.

## या अंकात काय वाचाल?


- हरवा व करवा - करवाने हरवाला सुचविली जाहिरातीची नवी युक्ती......पान २
- आपले आरोग्य आपल्या हाती - क्षयरोग किंवा टि.बी टाळता येतो. वाचा प्रतिबंधात्मक उपाय......पान २
- कौटुंबिक - पृथ्वीवर जर फक्त पुरुषच उरले तर?......पान ३
- क..क..कायद्याचा - रेशन कार्डात आपले नाव कसे नोंदवाल?......पान ३
- योजना - विद्युत जोडासाठी अनुदान योजना......पान ४
- पेराल ते उगवेल - सौ. संगीता कुंभार यांचे यश......पान ४
- याशिवाय संपादकीय, या महिन्यातील प्रमुख बातमीचे विश्लेषण आणि काही सूचक आकडेवारी जरूर वाचा.


## आकडेवारी

**३० %**

पुणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात तरतूद असूनही न वापरली गेलेली रक्कम!

(आकडे - कोटी रुपये)

- चालू वर्षीच्या अर्थसंकल्पात विकासकामांसाठी (पथ, विद्युत,पाणीपुरवठा, उद्याने) केलेली तरतूद - १०८७
- जानेवारीअखेरीपर्यंत झालेला खर्च - ३६५
- उर्वरित दोन महिन्यात होणारा अंदाजे खर्च - ५००
- निधीचा वापर - ७० टक्के

सकाळ : १८ जानेवारी २००७




भेटवस्तू - जाहिरातीचा नवा मार्ग

(हरबा आपल्या शिवणाच्या दुकानात शिलाई करीत आहे)
केरबा : येऊ का दुकानात ?
हरबा : अरे, ये की. परवानगी कसली घेतोयंस.
केरबा : आज आपल्याला शर्ट शिवायचाय बघ.
हरबा : वा ! शिऊ की लगेच.
केरबा : हे घे कापड आणि घे माप माझं.
हरबा : (कापड हातात घेत) कापड छान आहे. सासुरवाडीकडनं आलंय वाटतं.
केरबा : (हसत) तू बरं ओळखलंस.
हरबा : आता इतकी वर्ष व्यवसायात घालवल्यावर गिऱ्हाईक लगेच कळतं आपल्याला.
केरबा : व्यवसायात चांगला मुरलाय म्हणजे आता तू. धंदा चांगलाच चाललेला दिसतोय.
हरबा : चांगलाच म्हणायचा. बोल, फुल की हाफ शर्ट ?
केरबा : आता उन्हाळा येईलच तेव्हा हाफच कर.
हरबा : बर. कापड बरंच मोठंय. थोडं वाया जाईल असं दिसतंय. (असं म्हणत केरबाचे माप घ्यायला लागतो)
केरबा : काय रे तिथे कोपऱ्यावर नवीन शिवणाचं मोठं दुकान काढलंय म्हणे कुणीतरी ?
हरबा : काय सांगू केरबा. एकदम चकाचक दुकान आहे.
केरबा : मी तर असं ऐकलंय की तिथं कापड घेतलं तर एका शर्टच्या शिलाईवर दुसऱ्या शर्टची शिलाई फ्री आहे म्हणे.
हरबा : असेल बाबा. आता काय जमानाच फ्रीचा आलाय. बघतोय तिथे सेल अन् फ्री गिफ्ट.
केरबा : मग मला काही सूट देणार की नाही मित्र म्हणून ?
हरबा : काय चेष्टा करतोस केरबा. तुला माहीतच आहे की आपला जेमतेम १५-२० टक्के फायदा होतो. गिऱ्हाईकाला सूट दिली तर काय सुटेल मला ?
केरबा : मला एक कल्पना सुचली बघ. तू पण गिऱ्हाईकाला फ्री गिफ्ट देत चल.
हरबा : म्हणजे ?
केरबा : अरे तू मघाशी म्हणालास ना की हे कापड मोठे आहे. मी हाफ शर्ट शिवला तर थोडेफार वायाच जाईल की नाही ?
हरबा : मग काय असं कितीतरी कापड बाजूला पडतं रोज.
केरबा : हा मग झालं तर. अशा उरलेल्या कापडातून तू काहीतरी वस्तू बनवू शकतोस की नाही.
हरबा : काय बनवणार त्यातून.
केरबा : उदा. उशीचं कव्हर, किंवा टि.व्ही.चं कव्हर, झालंच तर छोटी पिशवी किंवा अगदीच काही नाही तर रुमाल तरी.
हरबा : अरे पण त्यानं काय होईल.
केरबा : गिऱ्हाईकानं असे दोन हाफ शर्ट शिवले की त्याला अशीच काहीतरी वस्तू गिफ्ट द्यायची.
हरबा : ही तर चांगली कल्पना आहे. त्याच्याच वाया गेलेल्या कापडातून त्यालाच भेट.
केरबा : लक्षात ठेव अशी भेट वस्तू तुझा गिऱ्हाईक घरी नेईल आणि वापरेल. त्याच्याकडे येणारे जाणारे नक्कीच विचारपूस करतील आणि तुझी आपोआप जाहिरात होईल. काय.
हरबा : वा ! आता लगेचच अमलात आणतो ही कल्पना.
केरबा : मग काय देणार का मला हाफ शर्टवर एक टिव्ही कव्हर फ्री ?
हरबा : देणार की पण हाफ शर्ट आणि फुल पँट एकदम शिवल्यावर. शिवतोस का फुलपँट लगेच.
केरबा : चल घे माप. (हरबा केरबा जोरजोरात हसायला लागतात.)

## आपले आरोग्य आपल्या हाती

### क्षयरोग

लेखन: डॉ. अभिजीत साळे,
[illegible]

टी.बी. / क्षयरोग हा एक संसर्गजन्य रोग आहे.
**मायकोबॅक्टेरियम ट्युबरकुलम** या टी.बी. च्या जिवाणूंमुळे हा रोग माणसांमध्ये होतो.

#### प्रसार व संसर्ग

**मायकोबॅक्टेरियम ट्युबरकुलम** हा जिवाणू हवेमार्फत पसरतो. हा विषाणू हवेमार्फत पुढीलप्रमाणे पसरतो.

- टी.बी. संसर्गजन्य रूग्णांनी खोकल्यास, हसल्यास, शिंकल्यास, बोलताना इ. प्रकारे टी.बी. चे जंतू हवेमार्फत पसरतात.
- जर दुसरा माणूस या वेळेस टी.बी. संसर्गित माणसाच्या जवळ असला तर त्याला संसर्ग / लागण होऊ शकते.
- टी.बी. ची लागण जर आपण टी.बी. संसर्गित व्यक्तिच्या नुसते एकदा / दोनदा किंवा २-४ मिनिटांपुरतेच जवळ आले तर होत नाही, तर टी.बी.चा संसर्ग होण्यासाठी टी.बी. संसर्गित व्यक्तीचा जवळचा सहवास असणे आवश्यक आहे. उदा. दाटीवाटीने राहणारी माणसे, एकच कुटुंब, ऑफिसमध्ये एकत्र काम करणे इ.

खालीलपैकी काही किंवा सर्व लक्षणे टी.बी. ने ग्रस्त असलेल्या व्यक्तीमध्ये दिसू शकतात.

- २-३ आठवड्यांपासून असणारा शुष्क (कोरडा) खोकला-नंतर खोकल्यातून रक्त पडू लागते.
- थकल्यासारखे / अंग गळून गेल्यासारखे वाटणे
- वजन कमी होणे
- भूक न लागणे
- ताप येणे
- रात्री घाम येणे
- खोकताना छातीत दुखणे

#### प्रतिबंधक उपाय :



बी.सी.जी. लस - बाळ जन्मल्यानंतर ३ तासांच्या आत ते महिना झाल्यावर ही लस बाळाला द्यावी.



जाता येता रस्त्यावर थुंकू नये. खोकताना तोंड बाजूला करून खोकावे / तोंडावर रूमाल ठेवावा.



घर व परिसर स्वच्छ ठेवावा. घरात योग्य प्रमाणात उजेड येईल / हवा खेळती राहील हे पहावे. दमटपणा बिलकुल नसावा.



जास्त शिजवलेले, शिळे, तेलकट पदार्थ टाळावे. पौष्टिक आहार असावा. ऋतुनुसार फळांचा समावेश असावा.




पुरेसा आराम व झोप घ्यावी.



रोज १५ मिनिटे तरी स्वत:ला जमेल तसा व्यायाम करावा.



#### चिकित्सा :

- राष्ट्रीय स्वास्थ्य कार्यक्रमांपैकी - १९९३ साली D O T S (डॉटस्) हा कार्यक्रम राबवण्यास सुरूवात झाली.
- या कार्यक्रमाद्वारे एक दिवसाआड एक असे टी.बी. झालेल्या माणसांना डॉटस् सेंटर मध्ये बोलावून स्वास्थ्य सेवक स्वत:समोर डॉटस् कार्यक्रमानुसार गोळ्या रूग्णास द्यायला सांगतो. हा गोळ्यांचा कोर्स २ महिने, ६ महिने, ९ महिने, व्याधीच्या अवस्थेनुसार ठरवला जातो.
- ही टी.बी. ची चिकित्सा राष्ट्रीय स्वास्थ्य कार्यक्रमानुसार विनामूल्य सर्व सरकारी स्वास्थ्य केंद्रांमध्ये दिली जाते.

## कौटुंबिक



एकदा पृथ्वीतलावरील सर्व स्त्रिया परमेश्वराकडे गेल्या व म्हणाल्या देवा, असा वर दे की आम्हाला सर्वांना मुलगाच होईल! ही मागणी ऐकून देव आश्चर्यचकित झाला. त्याने विचारले की हा असा वर तुम्हाला का हवा आहे ? तेव्हा जमलेल्या महिला एक एक करुन स्त्रियांची व्यथा सांगू लागल्या.

परवा माझ्या शेजारणीला मुलगा होत नाही म्हणून तिच्या सासू व नवऱ्याने तिला जिवंत जाळले. शांता म्हणाली.
माझ्या नवऱ्याने मला मुलगा होत नाही म्हणून दुसरे लग्न केले. कमला म्हणाली.
मला सहा मुली आहेत तरही मुलाच्या हट्टासाठी पुन्हा गरोदर रहावे लागणार आहे. निर्मला म्हणाली.
ही व्यथा ऐकून परमेश्वर व्यथित झाला आणि भावनेच्या भरात त्याने सर्व स्त्री जातीला असा वर दिला की सर्वांना होणारे अपत्य मुलगाच असेल!



झाले, पृथ्वीवर आनंदी आनंद झाला. सर्व दवाखान्यांतून बाळंतिणींना मुलगेच होऊ लागले. सर्व बाप, सासू, सासरे, आजी, आजोबा आनंदाने नाचू लागले. पेढ्यांचे भाव वाढले.



काही दिवस अतिशय आनंदात गेले. पण हळूहळू स्त्रिया वृद्ध होऊ लागल्या. त्यांना आपल्या मुलांच्या लग्नाची काळजी वाटू लागली. या मुलांशी लग्न करायला पृथ्वीवर मुलीच नाहीत! लग्नसमारंभ बंदच झाले. त्यामुळे घराघरातून दिसणारी लहान मुले दिसेनाशी झाली. सर्व पुरुषांनाही स्त्रियांशिवाय असणारे हे जग नीरस वाटू लागले. पृथ्वीतलावरील आनंद मावळू लागला. तेव्हा सर्व मानवजातीला आपली चूक कळली.



शेवटी सर्व पुरुष परमेश्वराकडे गेले आणि त्यांनी स्त्रियांना दिलेला वर काढून घेण्याची विनंती केली. देवाने हसत हसत ही विनंती मान्य केली आणि मानवजातीला निसर्गाच्या विरुद्ध न वागण्याचा सल्ला दिला.

काय मंडळी ? कशी वाटली ही गोष्ट ? वरवर काल्पनिक वाटणारी ही गोष्ट आता सत्यात उतरते की काय अशी परिस्थिती आली आहे.
तुम्हाला माहीत आहे का भारतात सध्या १००० पुरुषांमागे फक्त ९३३ स्त्रिया आहेत. आता प्रगत शास्त्रामुळे मुलांचे लिंग गर्भातच कळू लागले आहे. गर्भ लिंगचाचणी जरी कायद्याने गुन्हा असला तरी कित्येक कुटुंब जर मुलीचा गर्भ असेल तर तो पाडतात. स्त्री-भ्रूण हत्यांचं हे प्रमाण वाढतच आहे.

निसर्गात :च स्त्री व पुरुषांचे प्रमाण योग्य ठेवले जाते. पण मानवाने त्यामध्ये हस्तक्षेप केला. आपण वेळीच योग्य पावले उचलली नाहीत तर वरील गोष्टीत सांगितल्याप्रमाणे अनर्थ होईल. तेव्हा योग्य पाऊल आपण आपल्या घरापासून उचलायला सुरुवात करू या. नाही का ?

लेखन: नेहा घाणेकर,
स्वाभिमान

## क.क.कायद्याचा

### रेशन कार्ड

पत्नीचे नाव रेशन कार्डात घालावयाचे असल्यास -

रेशनकार्डात मुळात पती-पत्नी दोघांचे नाव असणे आवश्यक आहे. पत्नीचे नाव पतीच्या रेशनकार्डात नसल्यास तिचे नाव प्रथम कार्डात घालून घेणे आवश्यक आहे.

- पत्नीचे नाव माहेरच्या कार्डात किंवा अन्य कोणत्याही कार्डात असल्यास त्यातून ते कमी करून घ्यावे लागते.
- त्यासाठी त्या ठिकाणच्या रेशनिंग ऑफिसमध्ये अर्ज देऊन नाव कमी करून त्यासंबंधी चिठ्ठी आणणे महत्त्वाचे आहे.
- ही चिठ्ठी, पतीचे रेशनकार्ड व लग्नाचा पुरावा (लग्नाचा दाखला / लग्नपत्रिका ) जोडून नाव घालण्यासाठी रेशनिंग ऑफिसमध्ये अर्ज करावा. (रेशनिंग ऑफिसचा पत्ता - शिवाजीनगर गोडाऊन, कोर्टसमोर. )
- लग्नाचा दाखला नसल्यास संबंधित ॲफिडेव्हिट करावे लागते. (ॲफिडेव्हिट कोणत्याही वकिलामार्फत करून घेता येते. त्यासाठी अंदाजे १५० रु. पर्यंत खर्च येतो.)

कुटुंबातील व्यक्तीच्या मृत्यूनंतर नाव काढावयाचे असल्यास -



- त्यासाठी रेशनिंग ऑफिसमध्ये सकाळी १० ते १ या वेळात अर्ज करावा लागतो.
- या अर्जाबरोबर मृत्यू दाखला जोडावा लागतो. सकाळी अर्ज दाखल केल्यास साधारणपणे दुपारपर्यंत मयताचे नाव कमी करून मिळते. (नावासमोर 'मयत' असे लिहून नावाभोवती गोल करतात किंवा नावावर काट मारतात.)

रेशनकार्डामध्ये मुलांची नावे घालण्यासाठी -

रेशनकार्डात मुलांची नावे घालण्यासाठी रेशनिंग ऑफिसमध्ये अर्ज करावा. यासाठी -

- ६ वर्षांच्या आतील मूल असल्यास जन्मदाखला जोडावा.
- ६ वर्षांवरील मुलांसाठी जन्मदाखल्याबरोबरच ॲफिडेव्हिट करावे लागते. (ॲफिडेव्हिटमध्ये यापूर्वी इतर कोठेही रेशनकार्डात नाव नोंदविले नसल्याचे नमूद करावे.)
- रेशनकार्डात नाव घालण्यासाठी अंदाजे १५ दिवस लागतात.

मुख्य ऑफिस : नागरवस्ती विकास योजना

## वाचकांच्या प्रतिक्रिया...

छोट्या जागेचा खूप चांगला वापर करुन वस्तीतील लोकांच्या जिव्हाळ्याचे अनेक विषय हाताळले जातात. भाषा सहज, सोपी व सर्वांना समजेल अशी असते. विशेषत: हरवा केरवाचे संभाषण अधिक लोकप्रिय आहे. त्यातून खूप शिकायला मिळतं. आरोग्यविषयक सदराचाही महिलांना खूप फायदा होतो.

शाखाप्रमुख
अन्नपूर्णा परिवार विकास संवर्धन

---

वाचनाने ज्ञानात भर पडते. मनोगत वाचल्याने आरोग्य व व्यवसायासंबंधी चांगली माहिती मिळाली.

सौ. लक्ष्मी घोत्रे
लोहियानगर

---

मनोगत हे उत्तरोत्तर दर्जेदार माहितीपत्रक होत आहे. याचे मासिकात रूपांतर करावे. मनोगत फक्त मिटिंगमध्ये आलेल्यांपुरतेच मर्यादित न ठेवता वस्तीतील सर्वांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करावा.
शाखाप्रमुख
पर्वती स्वयंरोजगार

---

मनोगत पूर्वी साध्या स्वरुपात होते. परंतु आताचे मनोगत आकर्षक आहे. मनोगतच्या प्रती सभासदांनी घरी वाचायला नेल्या परंतु त्या कमी पडल्या. सभासदाने केवळ मनोगत ऐकणे हाच हेतू नसून ते ऐकून आचरणात आणावे हा हेतू असतो. मनोगत वाचताना सभासदही अनेक अनुभव सांगतात त्याचाही इतरांना फायदा होतो.

शाखाप्रमुख
अन्नपूर्णा परिवार विकास संवर्धन

---

मनोगतमधील हरवा व केरवा यांच्यामुळे धंद्याबद्दल चांगली माहिती मिळाली. तसेच इतर लेखांमुळे ज्ञानात भर पडली.
सौ. मेमाणे
हडपसर

---

आपल्या प्रतिक्रिया मागील पानावर दिलेल्या कात्रणातील उत्तरांबरोबर जरुर कळवा.

# योजना

## विद्युत जोडासाठी अनुदान योजना (फक्त मागासवर्गीयांसाठी)

वस्तीतील मागासवर्गीय कुटुंबांच्या विकासास प्रोत्साहन देण्यासाठी पुणे म.न.पा. अंतर्गत यूसीडी ही योजना राबवत आहे. या योजनेतून आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल (मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय) कुटुंबांना विद्युत जोडासाठी अनुदान दिले जाते.

| वैशिष्ट्ये | कोणासाठी | वयोमर्यादा | शैक्षणिक पात्रता | कौटुंबिक वार्षिक उत्पन्न | कागदपत्रे | अर्ज मिळण्याचे व भरण्याचे ठिकाण | संपर्क |
|---|---|---|---|---|---|---|---|
| या योजनेअंतर्गत मागासवर्गीय कुटुंबांना झोपडी दुरुस्तीसाठी रु. २,००० इतके अनुदान दिले जाते. | म.न.पा. हद्दीतील मागासवर्गीय कुटुंबांसाठी | नाही | नवसाक्षर | रु. १, ००, ००० च्या आत | १. पुणे म.न.पा. हद्दीतील रेशनकार्ड (साक्षांकित प्रती)<br>२. शेजारसमूह गटाचा उत्पन्नाबाबतचा ठराव<br>३. महाराष्ट्र शासनाचा जातीचा दाखला<br>४. म.न.पा. च्या क्षेत्रीय कार्यालयाकडून विद्युत जोडासाठी ना हरकत प्रमाणपत्र<br>५. सेवा शुल्क (टॅक्स) भरल्याची पावती<br>६. विद्युत जोडाबाबत म.रा.वि.मं कडील खर्चाचे अंदाजपत्र (एस्टिमेट) | १. आपल्या वस्तीतील समूह संघटिका<br>२. एस्. एम्. जोशी सभागृह, दारूवाला पूल, पुणे. फोन:२६३३६२४९ | एस्. एम्. जोशी सभागृह, दारूवाला पूल, पुणे. फोन:२६३३६२४९<br>लेखन: विजया भोसले, स्नेहदीप |

## आपला अभिप्राय या कात्रणातून आमच्यापर्यंत पोहोचवा

अभिप्राय - फेब्रुवारी: २००८

संस्था:

शाखा क्रमांक:

या महिन्यातील सर्वात जास्त आवडलेला लेख:

आपल्या रोजच्या जीवनात मनोगत मध्ये सांगितलेली कोणती गोष्ट आपण अंमलात आणाल?

तुम्हाला एखाद्या विषयाची माहिती हवी असल्यास तो विषय नमूद करा:

आपले नाव:

वय:

घरातील सदस्यांची संख्या:

या प्रश्नांव्यतिरिक्त तुमच्या सूचना, तुमच्या समस्या, तुम्ही लिहिलेले लेख, कविता या पत्त्यावर जरुर पाठवा:


- संपर्क :१४ लँडमार्क अपार्टमेंट, डी. जे. रोड, साधू वासवानी चौक, पुणे-४११००१.
- फोन: ०९१ (२०) २६०५ ३०९३
- ईमेल: upliftindiaatul@gmail.com


## पेराल ते उगवेल

### सौ. संगीता गोविंद कुंभार



विविध उत्सवांच्या या आपल्या देशात उत्सवांमुळे आनंदाबरोबरच व्यवसायाची संधीही उपलब्ध होते. पण या संधीचे सोने फारच कमी व्यावसायिक करु शकतात. अन्नपूर्णा परिवार विकास संवर्धन या संस्थेच्या सदस्या सौ. संगीता गोविंद कुंभार यांची कहाणी आपल्याला निश्चितच प्रोत्साहन देते.

आपल्या दोन लहान मुलांबरोबर सौ. संगीता आपल्या पतीबरोबर मांजरी येथे राहतात. पतीच्या उत्पन्नावरच आपला घरखर्च भागवावा लागत असल्याने आपणही व्यवसाय करावा असे संगीता यांना वाटू लागले. म्हणून २००० साली त्यांनी गणपतीच्या मूर्ती बनविण्याचा व्यवसाय सुरु केला. सुरुवातीपासून सुमारे १५० ते २०० मूर्तींची विक्री होत होती. चार-पाच वर्ष व्यवसाय व्यवस्थित सुरु होता पण फक्त गणपती उत्सवाच्या काळात व्यवसाय चालायचा.



२००६ साली अन्नपूर्णाच्या कार्यकर्त्यांनी संगीताताईंना घरी भेट दिली संस्थेच्या उपक्रमांची माहिती दिली. त्यांना ७००० रुपयांचे कर्जही लगेच मिळाले. मिळालेल्या कर्जातून त्यांनी पेंटिंग मशीन विकत घेतले तसेच जास्त कच्चा माल आणला. त्याच वर्षी सुमारे २५० मूर्तींची विक्री झाली. वेळेत हप्ताही फिटत गेला.

२००७ साली त्यांनी १०, ००० रुपयांचे दुसरे कर्ज घेतले. आता त्या दुर्गा, श्रीकृष्ण अशा इतर मूर्तीही बनवत आहेत.



आता आम्ही मूर्त्यांची संख्याही वाढवली आहे तसेच मूर्त्यांचे प्रकारही वाढवले आहेत. त्यामुळे फक्त गणपतीच्या काळात चालणारा हा व्यवसाय वर्षभर सुरु असतो आणि दर महिन्याला २००० ते २, ५०० उत्पन्नही मिळते. असे सांगताना त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद जाणवतो. आपल्या खेळणाऱ्या मुलांकडे बघत त्या आत्मविश्वासाने सांगतात की या वर्षी आम्ही ५०० मूर्त्या विकायचे ठरविले आहे आणि पुढील दोन वर्षात १००० मूर्ती नक्कीच विकू शकू.

सौ. संगीता कुंभार यांच्या व्यवसायास मनोगततर्फे शुभेच्छा!

लेखन: क्रिस्टिन, स्वाभिमान